तपासी अधिकाऱ्यांचे कॉपी.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर  P.S. (पोलीस ठाणे): जामखेड  Year (वर्ष): 2026
   FIR No. (प्रथम खबर क्र.): 0265  Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 07/05/2026 02:56 वाजता

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

   1 Day (दिवस): बुधवार  Date from (दिनांक पासून): 06/05/2026  Date To (दिनांक पर्यंत): 06/05/2026

   Time Period (कालावधी): प्रहर ६  Time From (वेळेपासून): 15:06 तास  Time To (वेळेपर्यंत): 15:23 तास

   (b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 07/05/2026  Time (वेळ): 02:15 तास

   (c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 007  Date and Time (दिनांक आणि वेळ): 07/05/2026 02:38 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

   1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): पश्चिम, 1 कि.मी.  Beat No. (बीट क्र.):

      (b) Address (पत्ता): नगर परीषद कार्यालयाचे समोर , जामखेड ,जामखेड

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजु बबन आल्हाट

(b) Father's Name (चे नाव ): बबन आल्हाट

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1988 (d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | ला प्र वि अहिल्यानगर , अहिल्यानगर , तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पत्ता | ला प्र वि अहिल्यानगर , अहिल्यानगर , तोफखाना, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9420896263

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिजीत जालिम भैसडे | | | 1. तपनेश्वर गल्ली मारुती,Town/Village (शहर / गाव): मंदिराजवळ जामखेड,Tehsil (तहसील): जामखेड,Police Station (पोलीस ठाणे): जामखेड,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | अहमद इलियास शेख | | | 1. खर्डा रोड,काझीगल्ली मज्जीद समोर,Town/Village (शहर / गाव): जामखेड,Tehsil (तहसील): जामखेड,Police Station (पोलीस ठाणे): जामखेड,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.07/06/2026

मी राजु बबन आल्हाट, वय 38 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 9420896263.

समक्ष जामखेड पोलीस स्टेशन,जि.अहिल्यानगर येथे हजर राहुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर दिनांक 10/07/2023 पासुन कार्यरत आहे.

दि.05/05/2026 रोजी श्री.अजित त्रिपुटे,पोलीस उपअधीक्षक,ला.प्र.वि.अहिल्यानगर यांनी एका तक्रारदाराचा मोबाईल क्रमांक देयुन सदर मोबाईल क्रमांकावर संपर्क करून तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पुढील कारवाई करणेबाबत आदेषित केलेले होते त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांचेषी संपर्क करून त्यांचे तक्रारीबाबत माहिती घेतली व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे बोलाविले असता तक्रारदार चांद षेख यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे समक्ष आमची भेट घेतली त्यावेळी त्यांनी तक्रारीचा आषय सांगुन नगरपरिशद जामखेड येथील लोकसेवक लाच मागणी करत असलेबाबत तक्रार सांगितली व ते सदर लोकसेवकंास दि. 06/05/2026 रोजी जामखेड नगरपरिशद, जि.अहिल्यानगर येथे भेटणार असलेबाबत सांगितले.तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारी नुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा होत असल्याने आम्ही तक्रारदार चांद षेख यांना दिनांक 06/05/2026 रोजी 09/00 वा.चे सुमारास चांदणी चैक,अहिल्यानगर येथे थांबण्यास सांगुन गापेनिय कामकाजाकरीता वस्तु व सेवा कर विभाग, अहिल्यानगर यांचे कडुन उपलब्ध करून घेतलेले व कार्यालयामध्ये हजर असलेल्या पंचांना आमचे कक्षामध्ये बोलावुन त्यांना एका तक्रारदाराकडे लोकसेवक लाच मागणी करत असलेबाबत तक्रारीचा आषय सांगितला व सदर तक्रारदार हे लोकसेवकास दिनांक 06/05/2026 रोजी जामखेड नगरपरिशद येथे भेटणार असल्याचे पंचांना सांगुन तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारीप्रमाणे पुढील कारवाईबाबत माहिती दिली व नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांना सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोना काळे, पोकाॅ वाघ, पोकाॅ कुळधर यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाषी ओळख करून दिली व नमुद पंच साक्षीदार तसेच सापळा पथकातील कर्मचा-यांना दिनांक 06/05/2026 रोजी सकाळी 08/30 वा.चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर राहणेबाबत कळविले.

आम्ही दिलेल्या सुचनांप्रमाणे दि. 06/05/2026 रोजी वस्तु व सेवा कर विभाग,अहिल्यानगर येथील दोन पंच साक्षीदार तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील कर्मचारी हे 08/30 वा.चे सुमारास कार्यालयात हजर झालेनंतर आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व

साहित्यानिषी षासकीय वाहन क्र. एमएच-16 डि.डब्ल्यु 7014 ने 08.45 वा. निघुन चांदणी चैक,अहिल्यानगर येथे तक्रारदार चांद षेख यांना षासकिय वाहनामध्ये बसवुन तक्रारदार चांद षेख व पचांची ओळख करून देवुन षासकिय वाहन मिरजगाव - माहिजळगाव-अरणगाव मार्गे घेवुन जामखेड येथील सुरक्षित ठिकाणी पोहचलो.त्यानंतर आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव चांद इब्राहिम षेख,वय-72 वर्षे,व्यवसाय-मजुरी,रा.घर नं.3341,बुरूड गल्ली,काला मारूती मंदिराषेजारी,अहिल्यानगर,ता.जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, "मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहत असुन माझे परिवारामध्ये पत्नी मुमताज षेख,दोन मुले फिरोज व युनुस व दोन मुली मिनाज व गुलनाज असे असुन मुलगी मिनाज हिचे लग्न झालेले असुन ती तिचे पतीसोबत मुकुंद नगर येथे राहत आहे तसेच मुलगी गुलनाज हिचा घटस्फोट झाल्याने ती माझेसोबत राहत आहे.माझी सासुरवाडी जामखेड,जि.अहिल्यानगर येथील असुन माझा मुलगा फिरोज व मुलगी मिनाज यांचा जन्म खैरनार हाॅस्पीटल,जामखेड येथे झालेला आहे त्यामुळे मी मुलगा फिरोज षेख व मुलगी मिनाज षेख यांचा जन्माचा दाखला मिळण्याकरीता जामखेड नगरपरिशद येथे दिनांक 26/11/2025 रोजी अर्ज दिला होता.व त्यावेळी जामखेड नगरपरिशद येथील जन्म मृत्यु नोंद विभागातील लिपिक अभिजित भैसडे यांना भेटलो होतो व जन्म दाखला मिळणेकरीता विनंती केली होती त्यानंतर दिनांक 10/12/2025 रोजी पुन्हा लिपिक अभिजित भैसडे यांची भेट घेवुन त्यांना मुलांचा जन्म दाखला मिळणेकरीता विनंती केली होती.व त्यानतर मी जन्म दाखल मिळणेकामी वेळोवेळी लिपिक अभिजीत भैसडे यांना फोन करून विनंती केली होती त्यावेळी त्यांनी मला जामखेड नगरपरिशदेमधील कर्मचारी गुड्डु षेख यांचा मोबाईल नंबर दिला व त्यांना संपर्क करण्यास सांगितला होता त्याप्रमाणे मी जामखेड नगरपरिशदेमधील गुड्डु षेख यांना त्यांच्या 9623255048 या मोबाईल क्रमांकावर फोन करून जन्म दाखल मिळणेकामी बोलणे केले होते त्यावेळी त्यांनी मुलांच्या आईचे नाव जन्म नोंदवहि मध्ये मुमताज ऐवजी मुन्ना असे लिहिलेले आहे असे सांगितले सदर मुलांचे आईचे नाव मुन्ना ऐवजी मुमताज करून दोन्ही मुलांचा जन्म दाखला देण्याकरीता लिपिक अभिजित भैसडे यांचेकरीता एका जन्म दाखल्याचे 1,500/- रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे 3,000/- रूपये लाचेची मागणी केली तेव्हा माझे लक्षात आले कि,गुड्डु षेख हे माझा मुलगा फिरोज षेख व मुलगी मिनाज षेख यांना जन्म दाखला देण्याकरीता लिपिक अभिजित भैसडे यांचेकरीता 3,000/- रूपये लाचेची मागणी करत आहे.मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही." अषी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्याक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार चाँद शेख यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक भैसडे तसेच लोकसेवक गुड्डु षेख यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार चांद षेख व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार चांद षेख व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार चांद षेख यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार

चांद षेख असे जामखेड येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित असलेबाबत निवेदन ध्वनिमुद्रित केले.

त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार चांद षेख व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या तसेच तक्रारदार चांद षेख यांचेकडे वाहन उपलब्ध नसल्याने षासकिय वाहनावरील चालक पोहेकाॅ दषरथ लाड यांना तक्रारदार तसेच पंच नं.1 यांना सोबत घेवुन जावुन जामखेड नगरपरिशदेच्या जवळ सोडणेबाबत तसेच तक्रारदार व लोकसेवक यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार व पंच न.1 यांना पुन्हा परत सुरक्षित ठिकाणी घेवुन येणेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून तक्रारदार चांद षेख यांच्या गळयात कोणासही दिसणार नाही अषा पध्दतीने अडकवुन आम्ही तक्रारदार चांद षेख व पंच नं.1 यांना जामखेड नगरपरिशद येथेठे 11/30 वाजता षासकिय वाहन क्र. एमएच-16 डि.डब्ल्यु 7014 ने चालक पोहेकाॅ दषरथ लाड यांचेसह वाहनाने जामखेड नगरपरिशद येथे रवाना केले. त्यानंतर 12/35 वाजेच्या सुमारास तक्रारदार चांद षेख व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी षासकिय वाहनाने परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार चांद षेख यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक भैसडे व लोकसेवक गुड्डु षेख यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार षासकिय वाहनाने रवाना होवुन षासकिय वाहनावरील चालक पोहेकाॅ लाड यांनी जामखेड नगरपरिशदेच्या जवळ गेल्यानंतर गाडी थांबवली त्यानंतर मी सोबत तक्रारदार असे षासकिय वाहनामधुन उतरून जामखेड नगरपरिशदेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील कक्षामध्ये जावुन थांबलो त्यानंतर काहि वेळाने तक्रारदार हे कक्षामधील इसमा सोबत त्यांचे मुलांच्या जन्म दाखल्या संबधी बोलु लागले त्यावेळी माझे लक्षात आले कि सदर इसम हे लोकसेवक अभिजित भैसडे आहे त्यावेळी लोकसेवक भैसडे व तक्रारदार यांचेमध्ये जन्म दाखल्यासंबंधी थोडी चर्चा झाली व त्यानंतर लोकसेवक भैसडे यांनी तक्रारदार चांद षेख यांना जामखेड नगरपरिशद मधील कर्मचारी गुड्डु षेख यांची जन्म दाखल्या संबंधी फोन करून भेट घेण्यास सांगितली.त्याप्रमाणे मी व तक्रारदार असे जामखेड नगरपरिशद कार्यालयाचे बाहेर आल्यानंतर तक्रारदार चांद षेख यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनवरून लोकसेवक गुड्डु षेख यांना फोन केला असता लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांना जामखेड नगरपरिशद समोरील खर्डा चैकामध्ये बोलावले त्यानंतर मी व तक्रारदार असे खर्डा चैकामधील बंद असलेल्या चहाच्या टपरीजवळ गेलो असता तेथे तक्रारदार यांना लोकसेवक गुड्डु षेख भेटले त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांचेसोबत त्यांचे मुलाचे जन्म दाखल्यासंबधी चर्चा केली त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांचेकडे त्यांच्या मुलीच्या व मुलाच्या जन्म दाखला लोकसेवक भैसडे यांचेकडुन तयार करून घेण्याकरीता एका जन्म दाखल्याचे 1,500/- रूपये असे दोन जन्म दाखल्याकरीता 3,000/- रूपये लाचेची मागणी केली सदर चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी लोकसेवक गुड्डु षेख यांना तक्रारदार यांचे पत्नीचे नाव मुमताज असल्याचे सांगुन जन्म नोंदणीवेळी मुन्ना असे नाव नमुद झाल्याचे सांगुन जन्म दाखल्यावर बदलुन मिळणेबाबत सांगितले त्यानंतर लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांचेकडुन त्यांच्या जन्माच्या दाखल्याची छायांकित प्रत तसेच तक्रारदार यांची पत्नी,मुलगा व मुलगी यांचे आधारकार्डाची छायांकित प्रती घेतल्या व त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांनी लगेच पैसे दिल्यास लोकसेवक भैसडे यांचेकडुन 4

वाजेपर्यंत जन्म दाखला तयार करून घेतो असे तक्रारदार चांद षेख यांना सांगितले. त्यावेळी तक्रारदार चांद षेख हे लोकसेवक गुड्डु षेख यांना अध्या तासामध्ये पैसे घेवुन येतो असे सांगितले त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख पहिले पैसे दयावे लागतील असे सांगितले त्यावेळी तक्रारदार चांद षेख यांनी पैसे कमी करण्यासाठी साहेबांसोबत बोलता येईल का याबाबत विचारले असता लोकसेवक गुड्डु षेख हे तक्रारदार चांद षेख यांना म्हणाले कि,साहेबांकडुन मी करून घेतो त्यासाठी पैसे दयावे लागतील त्यानंतर तक्रारदार चांद षेख यांचेकडुन लोकसेवक गुड्डु षेख यांनी कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेतल्यानंतर लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांना भेटण्याआधी फोन करण्यास सांगितला.त्यानंतर मी व तक्रारदार असे षासकिय वाहनाजवळ जावुन त्यामध्ये बसुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो अषी हकिगत सांगितली.,त्यांनतर तक्रारदार यांना पंचासमक्ष हकिगत विचारली असता त्यांनी पंच नं.1 यांनी सांगितलेल्या हकिगती प्रमाणे हकिगत सांगितली.

तक्रारदार व पंच नं 01 यांनी सांगितलेल्या हकिकती वरून व रेकॉर्ड झालेल्या संभाशणा वरून लोकसेवक भैसडे यांनी तक्रारदार चांद षेख यांना जन्म दाखल्यासंबंधी जामखेड नगरपरिशद येथील कर्मचारी गुड्डु षेख यांची भेट घेण्यास सांगितली त्यावेळी तक्रारदार चांद षेख यांनी पंचासह लोकसेवक गुड्डु षेख यांची भेट घेतल्यानंतर तक्रारदार चांद षेख यांचेकडे त्यांचे मुलाचा व मुलीचा जन्म दाखला काढुन देण्याकरीता एका दाखल्याचे 1,500/- रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे निशपन्न झाले. सदर कारवाईबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर लोकसेवक गुड्डु षेख यांचेविरोधात खर्डा चैक,जामखेड येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 3,000/- रूपये त्यात 200 रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा व 100 रूपये दराच्या 22 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहुन सदर कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकाॅ कुळधर यांनी करुन दाखविले. तक्रारदार चांद षेख यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थासिन पावडर लावण्यात आली. आमचे सुचनेवरून सदर लाच रक्कम पोकाॅ कुळधर यांनी तक्रारदार यांचे कुत्र्याच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी खर्डा चैक येथे जावुन लोकसेवक षेख यांची भेट घेवुन त्यांचसोबत कामा संदर्भाने तसेच मुलांच्या जन्म दाखल्यासंबधी चर्चा करावी तसेच लाच स्विकारले नंतरचा इषारा ठरवुन देण्यात आला. त्यानंतर तक्रारदार चांद षेख यांना लोकसेवक गुड्डु षेख यांची भेट घेण्यापुर्वी लोकसेवक गुड्डु षेख यांना फोन करून भेट घेण्याच्या ठिकाणाबाबत माहिती घेण्याचे ठरले व सदर काॅल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केले व आमचे सुचनेप्रमाणे तक्रारदार चांद षेख यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक गुड्डु षेख यांना 13/45 वा.चे दरम्यान फोन केला फोनवरील संभाशणादरम्यान लोकसेवक

गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांना 15/00 वाजता खर्डा चैक येथे बोलाविले व त्यांनी खर्डा चैक येथे आल्यानंतर फोन करतो असे सांगितले.सदर काॅल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात आला.लोकसेवक गुड्डु षेख यांनी 15/00 वा.खर्डा चैक येथे भेटण्याकरीता बोलाविले असल्याने व ते तक्रारदार चांद षेख यांना फोन करणार असल्याने 15/00 वा.पर्यंत सुरक्षित ठिकाणी थांबुन तक्रारदार चांद षेख यांचे फोनची वाट पाहण्याचे ठरले.त्यानंतर 15/00 वा.चे सुमारास लोकसेवक गुड्डु षेख यांचा तक्रारदार चांद षेख यांचे मोबाईल क्रमांकावर फोन आला व खर्डा चैक येथे भेटण्याकरीता बोलाविले त्यावेळी आम्ही,सापळा पथक,दोन्ही पंच व तक्रारदार चांद षेख असे षासकिय वाहनामध्ये बसलो वाहन चालक पोहेकाॅ लाड यांना षासकिय वाहन खर्डा चैकाचे बाजुस घेण्यास सांगितले.षासकिय वाहन खर्डा चैकाचे जवळ गेल्यानंतर व्हाॅईस रेकाॅर्डर तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अषा पध्दतीने अडकविले.तक्रारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक गुड्डु षेख यांची भेट घेण्यासाठी खर्डा चैकाचे बाजुने पायी 15/06 वा.चे सुमारास रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक पायी जात असताना एक इसम समोरून मोटारसायकलने येवुन तक्रारदार चांद षेख व पंच नं.1 यांचे समक्ष येवुन मोटारसायकल उभी करून बोलु लागले व त्यानंतर सदर इसम खर्डा चैकाचे बाजुने निघुन मोटारसायकलने निघुन गेला सदर इसमाचे पाठोपाठ तक्रारदार चांद षेख व पंच नं.1 जावु लागले व त्यापाठोपाठ सापळा पथक त्यांचे मागे पायी जावु लागले त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे जामखेड नगरपरिशदच्या समोरील मोकळया जागेत त्यांना भेटलेल्या मोटारसायकलवरील इसमाषी बोलत उभे राहिले त्यावेळी सापळा पथक आजुबाजुस सापळा लावुन थांबलो.त्यानंतर तक्रारदार व सदर इसम बोलत असताना तक्रारदार चांद षेख यांनी त्यांचे कुत्र्यामधील उजव्या बाजुच्या खिषामधुन उजव्या हाताने लाचेची रक्कम काढुन सदर इसमासमोर धरली असता सदर इसमाने त्याचे हातामधील कागदपत्रे उजव्या बाजुच्या बगलेमध्ये पकडुन तक्रारदार चांद षेख यांचेकडुन लाच रक्कम घेवुन दोन्ही हातांनी मोजुन डाव्या हाताने त्यांचे पॅन्टच्या पुढील डाव्या खिषात ठेवली असताना तक्रारदार यांनी लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इषारा केला.ती वेळ 15/23 वा.ची होती त्यावेळी आमची व सापळा पथकाची लोकसेवक गुड्डु षेख यांनी लाच स्विकारल्याची खात्री झाल्यानंतर आम्ही सदर ठिकाणी जावुन पंच नं.1 यांना विचारणा केली असता त्यांनी सदर ठिकाणी हजर असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन ते लोकसेवक गुड्डु षेख असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार चांद षेख यांचेकडुन उजव्या हाताने 3,000/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांना आम्ही ताब्यात घेतले व षासकिय वाहनामध्ये बसविले त्यावेळी पंच नं.02 करवी लोकसेवक गुड्डु षेख यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत करून पंच नं.02 यांचेकडील कागदावर नमुद केलेल्या नोटांचे नंबराषी पडताळणी करून पंच नं.02 यांना लाच रक्कम ताब्यात ठेवणेबाबत सुचना दिल्या.तसेच लोकसेवक गुड्डु षेख यांचेकडे मिळुन आलेले तक्रारदार चांद षेख यांचा जन्माच्या दाखल्याची छायांकित प्रत तसेच तक्रारदार चांद षेख यांची पत्नी मुमताज षेख,मुलगा फिरोज षेख व मुलगी मिनाज षेख यांच्या आधारकार्डाच्या छायांकित प्रती मिळुन आल्या सदर कागदपत्रांच्या छायांकित प्रती पंच नं. 2 यांनी आमचे सुचनेवरून ताब्यात घेतल्या.त्यावेळी आम्ही लोकसेवक गुड्डु षेख यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अहमद उर्फ गुड्डु इलियास षेख,वय-43 वर्शे,पद-मदतनीस,अग्निषामक दल, नगरपरिशद जामखेड, (कंत्राटि),रा.काजीगल्ली,मष्जिद समोर, खर्डारोड,

जामखेड,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार चांद षेख यांना जामखेड नगरपरिशद येथे थांबुन राहण्याच्या सुचना देवुन दोन पंचासह लोकसेवक गुड्डु षेख यांना षासकिय वाहनाने जामखेड नगरपरिशदे पासुन थोडया अंतरावर सुरक्षित ठिकाणी नेऊन लोकसेवक गुड्डु षेख यांना त्यांनी स्विकारलेल्या लाच रकमेमध्ये लोकसेवक भैसडे यांचा सहभाग आहे का?याबाबत विचारले असता लोकसेवक गुड्डु षेख यांनी सदर लाच रक्कम लोकसेवक भैसडे यांचेकरीता स्विकारल्याचे सांगुन त्यांचे मोबाईलवरून लोकसेवक भैसडे यांना फोन लावुन खात्री करून देतो असे सांगितले असता लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांचेकडे लोकसेवक भैसडे यांचेकरीता मागणी करून स्विकारलेल्या लाच रकमेमध्ये लोकसेवक भैसडे यांचा सहभाग आहे अगर कसे?यांची पडताळणी करण्याचे ठरले व लोकसेवक गुड्डु षेख व लोकसेवक भैसडे यांचेमधील कॉल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड करण्याचे ठरले त्याप्रमाणे लोकसेवक गुड्डु षेख यांना लोकसेवक भैसडे यांना काॅल करून मोबाईलचा लाॅऊडस्पिकर चालु केला त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख यांनी तक्रारदार चांद षेख यांचेकडुन 3,000/- रूपये घेतल्याचे सांगितले व आज त्यांचा दाखला तयार होईल का? असे विचारले असता लोकसेवक भैसडे यांनी आज संध्याकाळी तयार करून देतो असे सांगितले त्यावेळी लोकसेवक गुड्डु षेख पैसे घेवुन येवु का? असे विचारले असता लोकसेवक भैसाडे यांनी त्यांना पैसे घेवुन ठेवण्यास सांगितले. सदरचे संभाषण व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये रेकाॅर्ड करण्यात आले. सदरच्या संभाशणावरून लोकसेवक गुड्डु षेख यांनी लोकसेवक भैसडे यांचेकरीता स्विकारलेल्या लाचरकमेस लोकसेवक भैसडे यांनी संमती दर्षवुन लोकसेवक गुड्डु षेख यांना सदर लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचेे निश्पन्न झाले. त्यानंतर आम्ही लोकसेवक गुड्डु षेख,पंच व सापळा पथकासह जामखेड नगरपरिशद येथे जावुन लोकसेवक भैसडे यांना ताब्यात घेतले त्यावेळी त्यांना त्यांचे पुर्ण नाव,पद व पत्ता याबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अभिजीत जालिम भैसडे,वय-39 वर्शे,पद-लिपिक,जन्म मृत्यु नोंदणी विभाग,नगरपरिशद जामखेड,रा.तपनेष्वर गल्ली,मारूती मंदिरासमोर,जामखेड,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर असे सांगितले.त्यानंतर जामखेड नगरपरिशद येथील कक्षामध्ये आवष्यक तो अंधार करून लोकसेवक गुड्डु षेख यांच्या हाताच्या व त्यांनी स्विकारलेल्या लाचरकमेच्या नोटांच्या व अंगातील पॅन्टच्या अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाषात आवष्यक त्या तपासण्या केल्या.त्यानंतर लोकसेवक भैसडे यांचे ताब्यात असलेले तक्रारदार चांद षेख यांनी त्यांच्या मुलांचा जन्म दाखला मिळण्याकरीता केलेले दोन अर्ज,सदर अर्जाची आवक रजिस्टरला नोंद असल्याने सदर आवक रजिस्टर इत्यादी ताब्यात घेतले व त्यानंतर तक्रारदार चांद षेख यांना जामखेड पोलीस स्टेषन येथे येण्याच्या सुचना देवुन लोकसेवक गुड्डु षेख,लोकसेवक भैसडे व पंचासह जामखेड पोलीस स्टेषन येथे येवुन पोलीस निरीक्षक,जामखेड पोलीस स्टेषन यांना पत्र देवुन पंचनाम्याचे कामकाज करण्याकरीता विदयुत जोडणी असलेले दोन कक्ष उपलब्ध करून घेवुन त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 06/05/2026 रोजी 11/30 ते 12/35 वाजेच्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक अभिजीत जालिम भैसडे, पद-लिपिक,जन्म मृत्यु नोंदणी विभाग, नगरपरिशद जामखेड यांची तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांनी तक्रारदार यांचा मुलगा फिरोज षेख व मुलगी मिनाज षेख यांचा जन्म दाखला मिळणेकरीता दिलेल्या अर्जासंबंधी जामखेड नगरपरिशद येथे भेट घेतली असता लोकसेवक अभिजीत जालिम भैसडे यांनी जन्मदाखल्या संबंधी जामखेड

नगरपरिशदेतील कर्मचारी तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांना लोकसेवक अहमद उर्फ गुड्डु इलियास षेख, पद-मदतनीस,अग्निषामक दल, नगरपरिशद जामखेड, (कंत्राटि) यांची भेट घेण्यास सांगितली त्याप्रमाणे तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांनी पंचासह लोकसेवक अहमद उर्फ गुड्डु इलियास षेख यांची खर्डा चैक येथे भेट घेतली असता लोकसेवक षेख यांनी तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांचेकडे पंचासमक्ष त्यांचे मुलाचा व मुलीचा जन्मदाखला देण्याकरीता लोकसेवक अभिजीत जालिम भैसडे यांचेकरीता एका जन्म दाखल्याचे 1,500/- रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे 3,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्षवली व दिनांक 06/05/2026 रोजी 15/06 ते 15/23 वा.चे दरम्यान यषस्वी सापळा कारवाई वेळी लोकसेवक अहमद उर्फ गुड्डु इलियास षेख यांनी जामखेड नगपरिशद समोर तक्रारदार चांद इब्राहिम षेख यांचेकडुन पंचासमक्ष 3,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली असुन लोकसेवक अहमद उर्फ गुड्डु इलियास षेख यांनी लोकसेवक अभिजीत जालिम भैसडे यांचेकरीता मागणी करून स्विकारलेल्या लाचरकमेस लोकसेवक अभिजित जालिम भैसडे यांनी पंचासमक्ष संमती देवुन लोकसेवक गुड्डु षेख यांना सदर लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन आरोपी लोकसेवक 1) अभिजीत जालिम भैसडे,वय-39 वर्षे,पद-लिपिक,जन्म मृत्यु नोंदणी विभाग,नगरपरिशद जामखेड,रा.तपनेष्वर गल्ली,मारूती मंदिरासमोर,जामखेड,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर 2) अहमद इलियास षेख,वय-43 वर्षे, पद-मदतनीस, अग्निषामक दल, नगरपरिशद जामखेड, (कंत्राटि), रा.काजीगल्ली,मष्जिद समोर, खर्डारोड, जामखेड,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द माझी भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7अ,12 प्रमाणे कायदेषीर फिर्याद आहे.

समक्ष हि फिर्याद दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** dashrath nimba choudhari (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dashrath nimba choudhari

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**